महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २०३ वे दिनांक : १७/०७/२०२६ वार : शुक्रवार

## धावत्या मुंबई लोकलमध्ये रक्तरंजित थरार; प्रवाशांच्या हाणामारीत दोघे गंभीर



**मुंबई :** मुंबईची लाइफलाइन समजल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस अत्यंत गंभीर आणि चिंताजनक होत चालला आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी लोकल ट्रेनमध्ये झालेल्या एका तरुणाच्या हत्येची घटना ताजी असतानाच, 15 जुलै रोजी मध्यरात्री चालत्या लोकलमध्ये प्रवाशांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या रक्तरंजित राड्यात 2 प्रवासी गंभीर जखमी झाले असून, यामुळे मुंबईकरांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याशिवाय, चर्चगेट-विरार लोकल मधील हाणामारीचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

जून महिन्यात नालासोपारा लोकलमध्ये 24 वर्षीय मयांक लोहार या तरुणाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली होती. तर यापूर्वी जानेवारी महिन्यात मालाड स्थानकावर 32 वर्षीय कॉलेज प्राध्यापक आलोक सिंह यांच्यावरही चाकू हल्ला झाला होता. या पार्श्वभूमीवर, महायुती सरकारने रेल्वे पोलिसांना प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले असतानाच या नवीन घटना घडल्या आहेत.

बुधवार, 15 जुलै रोजी मध्यरात्री 12:30 वाजताच्या सुमारास सीएसएमटी-अंबरनाथ लोकल ट्रेन ठाकुर्ली आणि डोंबिवली स्थानकादरम्यान धावत असताना हा प्रकार घडला. ट्रेनच्या लगेज डब्यात सीटवर बसण्याच्या जागेवरून आणि गर्दीतून तीन प्रवाशांमध्ये जोरदार वाद झाला.

हा वाद इतका विकोपाला गेला की, त्यामध्ये राजू वाघे आणि साहिल खंदारे हे दोघे जण रक्ताच्या थारोळ्यात पडले. रेल्वे पोलिसांच्या (GRP) प्राथमिक तपासानुसार, आरोपी प्रीतेश कनोजिया याच्यासोबत हा वाद झाला होता. कोणत्याही धारदार शस्त्राचा वापर न करता, हातातील धातूच्या जड 'कड्याचा' मार लागल्याने दोन्ही प्रवाशांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

ट्रेन कल्याण स्थानकावर पोहोचताच रेल्वे सुरक्षा बल (RPF) आणि गव्हर्नमेंट रेल्वे पोलीस (GRP) जवानांनी जखमींना ताब्यात घेतले. त्यांना तातडीने रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रथमोपचार देऊन पुढील उपचारासाठी मुंबईच्या सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कल्याण जीआरपीने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

बुधवारीच कुर्ला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर एक व्यक्ती हातात लाकडी काठी घेऊन धावत सुटल्याने प्रवाशांमध्ये एकच घबराट पसरली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कुर्ला जीआरपीने तात्काळ कारवाई करत त्या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

वेस्टर्न लाईनवरही चर्चगेट-विरार लोकलच्या पुरुषांच्या डब्यात जागेवरून प्रवाशांमध्ये लाथाबुक्क्यांनी हाणामारी झाल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर फिरत आहे. रेल्वे प्रशासनाने या व्हिडिओच्या तारखेबाबत अधिकृत दुजोरा दिला नसला, तरी यामुळे नेटकऱ्यांनी मुंबईकरांच्या सुरक्षिततेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

कल्याण आणि कुर्ला रेल्वे पोलीस या दोन्ही प्रकरणांचा सखोल तपास करत आहेत. रेल्वे स्थानकांवरील आणि लोकल गाड्यांमधील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासून सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी शोधल्या जात आहेत. आगामी संसदेच्या आणि राज्याच्या अधिवेशनातही मुंबई लोकलमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित केला जाण्याची शक्यता आहे. रेल्वे सुरक्षा दल (RPF) रात्रीच्या लोकल प्रवासात गस्त वाढवण्याच्या तयारीत आहे.

या लागोपाठ घडणाऱ्या हिंसक घटनांमुळे रोज प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांमध्ये प्रचंड भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. रोजच्या प्रवासातील गर्दी आणि वाढता मानसिक तणाव यांमुळे प्रवाशांमधील सहनशीलता संपत चालल्याचे हे लक्षण मानले जात आहे. रेल्वे प्रशासनाने केवळ घोषणा न करता स्थानकांवर आणि धावत्या गाड्यांमध्ये प्रवाशांच्या जीविताच्या रक्षणासाठी तातडीने प्रत्यक्ष आणि कठोर पावले उचलावीत, अशी मागणी आता सर्व स्तरांतून जोर धरू लागली आहे.

## राष्ट्रवादीत सर्व आलबेल; विलीनीकरणाच्या चर्चांना तटकरेंचा पूर्णविराम



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत कलहाच्या आणि पक्ष विलीनीकरणाच्या उलट-सुलट चर्चांवर अखेर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पडदा टाकला आहे. "आमच्या पक्षात कोणताही गैरसमज नाही. आम्ही सर्वजण एकजुट आहोत आणि ज्या काही गोष्टी सांगायच्या असतात, त्या आम्ही थेट पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना सांगतो," असे स्पष्टीकरण तटकरे यांनी दिले. तसेच, शरद पवार गटासोबतच्या विलीनीकरणाच्या चर्चा आता भूतकाळ झाल्या असून त्याला पूर्णविराम मिळाला असल्याचे त्यांनी जाहीर केले.

अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पक्षाची धुरा सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याकडे आली आहे. अलीकडेच पक्षाचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मध्यरात्री 'वर्षा' निवासस्थानी घेतलेली भेट, सुनेत्रा वहिनींच्या निवडीला पक्षांतर्गत मिळालेली कायदेशीर नोटीस आणि शरद पवार गट महायुतीत (NDA) येणार असल्याच्या चर्चांमुळे राज्याचे राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. या सर्व घडामोडींवर सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेत पक्षाची अधिकृत भूमिका मांडली.

"स्वर्गीय दादा असताना दोन्ही गट एकत्र येण्याबाबत आणि विलीनीकरणाबाबत सकारात्मक चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती, हे वास्तव आहे. मात्र, दादांच्या निधनानंतर या प्रक्रियेला पूर्णविराम मिळाला. नुकत्याच झालेल्या शरद पवार गटाच्या बैठकीत सुप्रिया सुळे आणि त्यांचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही आता विलीनीकरणाची कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता नव्याने कुठेही चर्चा सुरू नाही," असे तटकरे म्हणाले.

मध्यरात्री 'वर्षा'वर झालेल्या बैठकीबाबत बोलताना तटकरे म्हणाले की, त्यांचा आणि शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या भेटीचा काडीमात्र संबंध नाही. जयंत पाटील हे ज्येष्ठ आणि स्वयंभू नेते असून ते सांगलीच्या नगरपालिकेच्या कामासाठी मुख्यमंत्र्यांना भेटले होते. तर, प्रफुल पटेल आणि आपण स्वतः रायगड व मतदारसंघातील इतर विकासकामांच्या मंजुरीसाठी आधीच वेळ मागितली असल्याने तिथे गेलो होतो, असा खुलासा त्यांनी केला.

सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षपदाला आव्हान देणाऱ्या नोटीसवर बोलताना तटकरे म्हणाले की, या विषयावर पक्षाच्या कोअर कमिटीत आणि देवगिरी बंगल्यावर सविस्तर चर्चा झाली आहे. लवकरच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत, ज्यामध्ये अर्थविभागासह अनेक महत्त्वाच्या शासकीय विषयांवर चर्चा केली जाईल.

स्वर्गीय अजित दादांच्या महाराष्ट्राच्या प्रगतीमधील योगदानाचा आदर करत राज्य सरकारने शासकीय कार्यालयांमध्ये त्यांची जयंती साजरी करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. याबद्दल तटकरे यांनी मुख्यमंत्री आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानले. बॅनरवर दादांचा एकच फोटो लावण्याच्या आणि जिओ टॅगिंगच्या पक्षाच्या निर्णयावर आमदारांमध्ये कोणतीही नाराजी नसून, सर्वांनी 15 दिवसांपूर्वीच देवगिरीवर एकत्र येऊन हा मसुदा निश्चित केला असल्याचे त्यांनी सांगितले.

पक्षातील महिला प्रदेशाध्यक्ष, युवक अध्यक्ष आणि युवती अध्यक्ष या रिक्त किंवा दीर्घकाळ कार्यरत असलेल्या पदांवर लवकरच पक्षाच्या कोर कमिटीमध्ये चर्चा करून नवीन नियुक्त्या केल्या जातील, असे संकेतही त्यांनी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जुलै २०२६


# बीएलओच्या निष्काळजीपणामुळे मतदानाच्या हक्कावर गदा; चौकशी करून कारवाईची नागरिकाची मागणी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** लोकशाहीचा पाया मानल्या जाणाऱ्या मतदानाच्या अधिकारावरच गदा आणणारा प्रकार जिंतूर तालुक्यात समोर आला आहे. मतदार यादीत अनेक वर्षांपासून नाव असतानाही कोणतीही पूर्वसूचना किंवा माहिती न देता संबंधित नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याप्रकरणी संतप्त झालेल्या नागरिकाने तहसीलदार, जिंतूर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून संबंधित बीएलओ (Booth Level Officer) यांच्या निष्काळजी-पणाची चौकशी करण्याची तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तक्रारदार संग्राम बाळमुकुंद शार्दे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ते अनेक वर्षांपासून जिंतूर शहरातील आपल्या राहत्या पत्त्यावर वास्तव्यास असून यापूर्वी प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या नावाची मतदार यादीत नियमित नोंद होती. मात्र, अलीकडे प्रसिद्ध झालेल्या अद्ययावत मतदार यादीत त्यांचे नाव अचानक गायब झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला असून मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहण्याची वेळ येण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.निवेदनात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, संबंधित बीएलओ यांनी आवश्यक पडताळणी न करता अथवा कोणतीही माहिती न देता मतदार यादीतून नाव वगळले आहे. ही गंभीर प्रशासकीय चूक असून यामुळे एका जबाबदार नागरिकाचा मतदानाचा मूलभूत अधिकार धोक्यात आला आहे. अशा प्रकारचा निष्काळजीपणा लोकशाही व्यवस्थेसाठी घातक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.तक्रारदाराने तहसीलदारांकडे सादर केलेल्या अर्जात संबंधित बीएलओच्या कामकाजाची सखोल चौकशी करण्याची, निष्काळजीपणा सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तसेच तातडीने आपले नाव मतदार यादीत पुन्हा समाविष्ट करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. भविष्यात अशा प्रकारे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव विनाकारण वगळले जाणार नाही, यासाठी प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान, निवडणुकीपूर्वी मतदार यादीतून नावे वगळली जाण्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येत असतात. अशा घटना टाळण्यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची वेळोवेळी खात्री करून घ्यावी, असे आवाहन निवडणूक विभागाकडून केले जात असते. मात्र, नियमित मतदाराचे नाव अचानक वगळल्याचा आरोप झाल्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.सदर निवेदन 14 जुलै 2026 रोजी तहसील कार्यालय, जिंतूर येथे प्राप्त झाले असून, आता प्रशासन या तक्रारीची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करते की केवळ औपचारिकता पूर्ण केली जाते, याकडे जिंतूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.- प्रमुख मागण्या1)मतदार यादीतून वगळलेले नाव तात्काळ समाविष्ट करावे.2)संबंधित बीएलओच्या कामकाजाची सखोल चौकशी करावी.3)दोषी आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई करावी.4)भविष्यात अशा चुका होऊ नयेत यासाठी जबाबदारी निश्चित करावी.मतदार यादीतून नाव वगळल्याचा आरोप करत नागरिक संग्राम बाळमुकुंद शार्दे यांनी तहसीलदार, जिंतूर यांच्याकडे सादर केलेले लेखी निवेदन.

# देवगिरी महाविद्यालयात पालक मेळाव्याचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात शनिवार दि.१८ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न होणार आहे. या पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवि पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ सदस्य डॉ. आदित्य येळीकर यांची उपस्थिती राहणार आहे.या पालक मेळाव्यात अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने ग्रामीण विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राबवलेले विविध कोर्सेस, योजना, JEE, NEET परीक्षेसोबतच, व्यावसायिक अभ्यासक्रमासंबंधी सखोल मार्गदर्शन या पालक मेळाव्यात विद्यार्थी व पालकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.या शिक्षक पालक मेळाव्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य डॉ.रवि पाटील, आयोजक देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अरुण काटे, पर्यवेक्षक डॉ. किरण पतंगे, प्रा. अनघा देशपांडे, डॉ. राजन राजपूत पालक मेळावा समितीच्या प्रमुख प्रा.उज्ज्वला भोसले यांनी केले आहे.

## माय मातीच्या कुशीत

माय मातीच्या कुशीत
रोप छान अंकुरलं
बळीराजाच्या डोळ्यात
आलं दाटून आभाळ

काळ्या भुईच्या कुशीत
स्वप्नं हिरवं उगलं
रान पाखरांच्या ओठी
गाणं पावसाचं आलं

येता झुळुक वाऱ्याची
रोप कोवळं मोहरलं
मृदगंधाच्या स्पर्शानं
रान सारं सुखावलं

आता येईल पाऊस
धारा अमृत घेऊन
साऱ्या शिवाराला आता
बळ जगण्याचं आलं

- ज्ञानेश्वर गायके, कन्नड


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जुलै २०२६


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर कट्टा विद्यार्थी संसद विद्यार्थी मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा शपथविधी




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत विद्यार्थी संसद' पदाधिकारी यांचा शपथविधी सोहळा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. करिअर कट्टाच्या माध्यमातून महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांनी "करिअर संसद सदस्य" म्हणून शपथ घेतली. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थी संसद पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. तसेच विद्यार्थ्यांना करिअर निवड, कौशल्य विकास, आणि उद्योजकता याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीकडे लक्ष न देता कौशल्य, उद्योजकता आणि नावीन्य यांचा विचार करून आपले भविष्य घडवावे असे मत त्यांनी व्यक्त केले.'करिअर संसद' उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये करिअरबाबत जागरूकता निर्माण करणे, योग्य मार्गदर्शन पोहोचवणे आणि नेतृत्वगुणांचा विकास साधणे यासोबतच या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील संधींचे भान येते, तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. यावेळी निवड झालेल्या सदस्यांना प्राचार्य संजय अस्वले यांनी शपथ दिली व सहर्ष स्वागत केले.यावर्षीच्या करिअर संसदेत कु. हांडे पूजा (मुख्यमंत्री), जाधव चेतन (नियोजन मंत्री), सूर्यवंशी सुशील (उद्योजकता विकास मंत्री), कु.काळे वैष्णवी (सामान्य प्रशासन मंत्री ) कु. टेकाळे निकिता (माहिती व प्रसारण मंत्री)कु. माने अदिती(महिला व बालकल्याण मंत्री), इंगळे प्रियांका (संसदीय कामकाज मंत्री), राऊळे पल्लवी (कौशल्य विकास मंत्री), पवार निलेश (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री), जाधव श्रावणी (कायदे व शिस्तपालन मंत्री) कु.जाधव दर्शनी ( सदस्य) अशा अकरा करिअर संसद सदस्यांना यावेळी शपथ देण्यात आली. या शपथविधी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनोद देवकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले यांची प्रमुख उपस्थिती लाभली तर प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. चंद्रसेन करे, डॉ. अर्जुन कटके व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सह समन्वयक डॉ.राम जाधव, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी मुख्यमंत्री करिअर कट्टा कु. आनिशा सुरवसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार गणेश मोरे ( जिल्हा नियोजन समिती सदस्य करिअर कट्टा) यांनी मानले.

## वेळ निघून गेल्यावर

आयुष्यभर जगतांना,
वेळे सोबत चालावे,
जिवंत असतांनाच,
माणसासारखे वागावे. १

थांबणार नाही मित्रा,
कधी कुणासाठी वेळ.
जिवंतपणी माणसाने,
बसवावे मित्रांशी मेळ. २

वेळ निघून गेल्यावर,
उपाय फोल ठरतात.
माणूस गेल्यानंतर,
गुणांची कदर करतात. ३

माणसाने माणसावर
भरभरून प्रेम करावे.
माणूस गेल्यावरही,
आठवण मागे उरावे. ४

वेळ निघून गेल्यावर,
आपले कळू लागतात.
अंथरुणावर पडताच
दीर्घायुष्य मागतात. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## घड्याळ दादा

घड्याळ दादा घड्याळ दादा
तू असा रे कसा?
रात्रंदिवस चालण्याचा
घेतला का वसा ?

तुझ्या इशाऱ्यावर
चाले सर्वांची धावपळ
सारखा आदेश देतोस
किती करतोस छळ?

तू दमून थांबला की
बाबा पिनगाळतात कान
चोवीस तास फिरतोस
हरपून देहभान

भल्या पहाटे किंचाळतो
बाबांचा असता धाक
साखर झोपेत असतांना
आईची येते हाक

पहाटेच्या शांत वेळी
करतो सर्वांची झोपमोड
अंथरूणावरून उठविण्याची
भारी तुझी खोड!



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९९०६**






## सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षिततेबाबत विद्यार्थ्यांना खंडागळे यांचे मार्गदर्शन



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** अंजना स्कूल ऑफ एक्सिलन्स येथे सायबर सिक्युरिटी व महिला सुरक्षेबाबत दौलताबाद पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांचे मार्गदर्शनसध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्हे आणि महिलांच्या सुरक्षेचा विषय अत्यंत संवेदनशील बनला आहे. याच पार्श्वभूमीवर अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस, आसेगाव येथे विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे उपस्थित होते. त्यांनी सायबर सिक्युरिटी आणि महिला सुरक्षा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की सायबर सिक्युरिटीसाठी अनोळखी लिंक व OTP कोणालाही शेअर करू नका,सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती टाकताना काळजी घ्याऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ 1930 हेल्पलाइन किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा तसेच महिलासुरक्षेसाठी स्वतःचा आत्मविश्वास वाढवा व प्रसंगी निर्भयपणे मदत मागा, 112 - आपत्कालीन क्रमांक आणि 1091 - महिला हेल्पलाइन नेहमी लक्षात ठेवा, शाळा-कॉलेज व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षेसाठी काळजी घ्यागुन्हे टाळण्यासाठी जनजागृती हाच खरा उपाय आहे, असे सांगून त्यांनी सर्वांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा पवार,उपाध्यक्ष मोनिका पल्हाळ, व्यवस्थापक देव साठे,आकाश इंगळे तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जुलै २०२६


## आषाढस्य प्रथम दिवसे: मेघदूताची आळवणी ते मान्सूनचे कृषी अर्थशास्त्र

आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुंवप्रक्रीडापरिणतग जप्रेक्षणीयं ददर्श ॥महाकवी कालिदासांनी 'मेघदूत' काव्यात आषाढाच्या पहिल्या दिवशी रामगिरी पर्वतावर झुकलेल्या ज्या काळ्या ढगाचे वर्णन केले, तो केवळ एका विरही यक्षाचा दूत नव्हता. तो ढग म्हणजे भारतीय उपखंडाच्या प्राणवायूचे, म्हणजेच 'मान्सून'च्या आगमनाचे पहिले निसर्गदत्त निमंत्रण होते. साहित्यिक परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास हा दिवस विरह, निसर्गसौंदर्य आणि काव्यात्मक अनुभूतीचा सर्वोच्च बिंदू ठरतो; म्हणूनच हा दिवस आपण 'कालिदास दिन' म्हणून साजरा करतो.परंतु,या साहित्यिक सौंदर्याच्या पलीकडे जाऊन जेव्हा आपण आजच्या वास्तवाकडे पाहतो, तेव्हा आषाढाचा हा पहिला मेघ केवळ काव्याचा विषय नसून हा विषय संपूर्ण भारताच्या ' कृषी अर्थव्यवतेचा कणा' आहे हे सामाजिक भान सुद्धा आपण राखले पाहिजे. कालिदासाचा मेघ भारत वर्षात जेव्हा बरसतो तेव्हा भारताच्या कृषी समृद्धीची पायाभरणी होते. म्हणूनच, आषाढ महिन्याच्या या सुरुवातीला साहित्यातील संवेदनशीलता आणि मान्सूनचे कृषी अर्थशास्त्र (Agro-Economics) यांची सांगड घालून एक शास्त्रीय संवाद होण्याची आजची गरज आहे आणि साहित्यिक जगताने याचे प्रतिबिम आपल्या साहित्यातून प्रकट करून आपली सामाजिक जबाबदारीचे भान राखले पाहिजे.ही आजच्या काळाची गरज बनली आहे.संस्कृत साहित्यात आषाढाच्या पहिल्या दिवसाला कमालीचे भावनिक महत्त्व आहे. उन्हाळ्याच्या तीव्र दाहकतेनंतर तृषार्त झालेली धरणी आणि आकाशात दाटून येणारे कृष्णमेघ यांच्यातील मीलनाचा हा सोहळा असतो.सारे निसर्ग अभ्यासक सुद्धा आनंदून जातात.कालिदासाने निसर्गाचे मानवीकरण करताना त्यात जी संवेदनशीलता फुंकली, ती भारतीय माणसाच्या मानसिकतेशी जोडलेली आहे. मातीचा पहिला सुवास (मृद्गंध) आणि मोरांचा केकारव हे मानवी मनाला एक आदिम आनंद देतअसतात. साहित्य आपल्याला निसर्गाशी कृतज्ञ राहण्यास शिकवते आणि याच कृतज्ञतेतून पर्यावरण रक्षणाची भावना निर्माण होते. साहित्याचा हा आल्हाददायक आनंद घेत आपण विज्ञानाच्या डोळ्यातून पाहिले तर मान्सूनचे एक अत्यंत गुंतागुंतीचे आणि अजस्त्र हवामानशास्त्रीय व कृषी अर्थाचे चक्र आपल्याला नजरेसमोर उभे राहते. भारताची जवळजवळ ८०% हून अधिक शेती आजही थेट पावसाच्या पाण्यावर (कोरडवाहू) अवलंबून आहे. आषाढातील पाऊस केवळ पिकांना पाणी देत नाही, तर भूगर्भातील पाणीपातळी वाढवतो, ज्यामुळे रब्बी हंगामाचीही सोय होते. जेव्हा देशात मान्सून चांगला होतो, तेव्हा ग्रामीण भागात उत्पादन वाढते. शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागतो आणि त्या परिणामी ट्रॅक्टर, दुचाकी, खते, बियाणे यांपासून ते दैनंदिन वापराच्या वस्तूंपर्यंत (FMCG Sector) ची बाजारपेठेत मागणी प्रचंड वाढते. म्हणजेच, मुंबई-दिल्लीसारख्या महानगरांमधील औद्योगिक चक्राची गती कापूस, सोयाबीन आणि धान पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतातील पावसावर अवलंबून असते. मान्सूनचा थेट संबंध देशाच्या अन्न सुरक्षेशी (Food Security) निगडित आहे. पाऊस योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पडल्यास अन्नधान्य, कडधान्ये आणि भाजीपाल्याचे दर नियंत्रणात राहतात, ज्यामुळे देशाचा महागाई दर (Inflation) स्थिर राहण्यास मदत होते.कृषी परिसंस्थेवर आजच्या बदलत्या हवामानमुळे नवीन आव्हाने उभी रहिली आहेत. आज एकविसाव्या शतकात कालिदासाचा मेघ काहीसा लहरी झाला आहे. हवामान बदल (Climate Change) आणि जागतिक तापमानवाढीमुळे मान्सूनच्या पॅटर्नमध्ये मोठे बदल झाले आहेत.या प्रतिणामी कधी आषाढ कोरडा जातो, तर कधी 'अतिवृष्टी' आणि 'ढगफुटी' (Cloudburst) मुळे पिकांचे अतोनात नुकसान होते.पावसाचे दिवस कमी झाले आहेत, पण एकाच दिवसात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण वाढले आहे.या बदलत्या काळात केवळ मान्सूनच्या आगमनाचे जरूर कौतुक करा पण सामाजिक बांहिलकी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.आज आपल्या समाजाला 'हरित वैज्ञानिक दृष्टिकोन' अंगीकारावा लागेल. हवामान अंदाजाचे अचूक तंत्रज्ञान, पाण्याचा थेंब अन् थेंब जिरवण्याचे जलव्यवस्थापन आणि बदलत्या हवामानाला तोंड देऊ शकणारी पिकांची विविध वाण शोधण्यावर (Climate-Resilient Agriculture) भर द्यावा लागेल. तशी चालना कृषी योजनेते दिली पाहिजे.तेव्हा आज गरज आहे ती साहित्याची संवेदनशीलता आणि विज्ञानाची जोड देऊन 'आषाढस्य प्रथम दिवसे' हा उत्सव साजरा करण्याची. केवळ भूतकाळातील काव्याचे गोडवे गाण्याचे हे दिवस नाहीत, तर आता साहित्याने वर्तमानातील पर्यावरणीय समस्या,बदलता मान्सून, शेतकरी, माती आणि पाणी यांच्याशी नव्या स्वरूपात नाते जोडण्याची गरज आहे.जेव्हा आपण कालिदासाच्या मेघदूताचा सत्कार करतो, तेव्हाच आपण भारतीय शेतीच्या शाश्वत विकासाचा आणि कृषी अर्थशास्त्राचा शास्त्रीय विचार केला पाहिजे. साहित्यातील संवेदनशीलता आणि विज्ञानाचा विवेक एकत्र आला, तरच आषाढाचा हा पहिला मेघ देशाच्या कानाकोपऱ्यात खऱ्या अर्थाने कृषी समृद्धीची, शेतकरी वर्गाच्या चिंताविरहित जीवनाची आणि आनंदाची बरसात करू शकेल.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


## 'पाठ्यपुस्तकातील लेखक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला'



**छत्रपती संभाजीनगर** : या कार्यक्रमाचे उद्घाटन बुधवार दि.१५ जुलै रोजी, सकाळी ७.३० वा. अगस्ती विद्यालय, भगतसिंग नगर, छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर ,समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. बालभारतीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' इ.४ थी या पाठाचे प्रत्यक्ष लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी अगस्ती विद्यालय भगतसिंगनगर, यशदा विद्यालय मयूरपार्क, न्यू हायस्कूल हर्सुल, भारती विद्यालय, सुपर थर्टी स्कूल एन- ११ हडको, अभीज्योत विद्यालय हडको, ज्ञानसागर विद्यालय एन - १२ हडको, छत्रपती संभाजीनगर येथील शाळेत लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, शिक्षकासोबत 'कौतुकाची थाप' या पाठावर दिलखुलासपणे चर्चा केली.आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तरे दिली. प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक लेखक, कवी निर्माण होऊन मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी व मराठी भाषेत विद्यार्थी हेउत्तीर्ण होईल अशी माहिती राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, आशा डांगे यांनी दिलेली असून कवी मनोज खुटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. या कार्यक्रम प्रसंगी वाहेद शेख, रमाकांत छडीदार, अकिल पठाण, रवींद्र तम्मेवार, मुदस्सर पठाण, दौलत खरात, आनंद खरात, सतीश देशमुख, सागर बोराडे, ज्ञानेश्वर काळे, मंजीत तुपे, ज्ञानेश्वर गोराडे ,गणेश सोनवणे, राजेंद्र शेवाळे, पारेश्वर साळवे, प्रवीण संसारे आदी उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जुलै २०२६


## जिंतूर तालुक्यात शिव रस्ता खुला करण्याची शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : तालुक्यातील मौजे पिंपरी खुर्द येथील गट क्रमांक १०१ ते १०७ मधील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी असलेला जुना शिवरस्ता काही व्यक्तींनी अडविल्याचा गंभीर आरोप करत संबंधित शेतकऱ्यांनी बुधवारी (१५ जुलै) जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले अनेक वर्षांपासून वापरात असलेला शेतरस्ता तातडीने खुला करून अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गट क्रमांक १०१ ते १०७ मधील शेतात जाण्यासाठी हा शिवरस्ता एकमेव मार्ग असून अनेक वर्षांपासून त्याचाच वापर केला जात आहे. मात्र, नरेश मंगुजी झवरे (रोजगार सेवक), पंढरीनाथ रामचंद्र घुगे, विष्णू बापूराव गिते, गोपीनाथ दामोदर गिते, संतोष बाबाराव गिते, दामोदर बापूराव गिते आदींनी हा शिवरस्ता अडविल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.शिवरस्ता बंद झाल्यामुळे शेतीची मशागत, पेरणी, फवारणी, पीक पाहणी तसेच इतर शेतीविषयक कामांसाठी शेतात जाणे अत्यंत कठीण झाले असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी यापूर्वीही तहसीलदार जिंतूर, उपविभागीय अधिकारी सेलू तसेच महसूल प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. ८ जुलै २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी संबंधित शिवरस्ता खुला करण्याबाबत आदेश दिल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, त्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी झाली नसल्याने आजही शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन महसूल विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करावी, अतिक्रमण हटवून जुना शेतरस्ता पूर्ववत खुला करावा आणि संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.या निवेदनानंतर आता जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते आणि शेतकऱ्यांच्या मागणीवर कितपत तत्परतेने कारवाई होते, याकडे पिंपरी खुर्द परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


# सरसेनापती नेताजी पालकर यांच्या तामसा येथील समाधी स्थळी भव्य स्मारक करा




**नांदेड (प्रतिनिधी)** : सरसेनापती नेताजी पालकर हे यांच्या समाधी-स्मृति स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व आहे.हे ठिकाण त्यांच्या उत्तरायुष्या तील स्मृतीशी जोडलेले असून, तामसा हे त्यांच्या जहागिरीतील महत्त्वाचा भाग मानले जाते. सरसेनापती नेताजी पालकर यांच्या तामसा येथील समाधी स्थळी उच्च दर्जाचे स्मारक करावे अशी मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासना कडे केली असुन त्या साठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत उपोषण छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सकाळी ११ वाजता सुरु केले आहे.या उपोषनात नांदेड जिल्हा शाखेचे बबन पाटील, दीपक राजुरकर व कैलास शिंदे यांनीही सहभाग घेतला आहे. सरसेनापती नेताजी पालकरांचे इतिहासात अंत्यन्त उच्च दर्जाचे स्थान होते.नेताजी पालकर हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रमुख मराठा सरदार होते त्यांना इतिहासात“ प्रतिशिवाजी ” किंवा “ दुसरे शिवाजी” असेही संबोधले जाते असे . त्यांच्या समाधी बाबत तामसा, जिल्हा नांदेड हा उल्लेख अनेक समकालीन/स्थानिक माहितीस्त्रोतांमध्ये आढळतो. तामसा येथील इतिहास तामसा परिसर हा नेताजी पालकरांच्या जहागिरीशी संबंधित असल्याचा उल्लेख आढळतो, आणि त्यांच्या स्मृतिस्थळा मुळे हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. हे स्मृतिस्थळ सातत्याने दीर्घकाळ उपेक्षित राहिले असून,तेथे जाण्या साठी मूलभूत सुविधा सुद्धा अपुऱ्या असुन ऐतिहासिक संदर्भ पाहता नेताजी पालकरांनी मराठा सत्तेच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.तामसा जिल्हा नांदेड हे केवळ एक गाव नसून, शिवकालीन स्मृती आणि सार्वजनिक जतनधोरण यांच्यातील दुवा आहे म्हणुन तामसा येथील नेताजी पालकरांचे स्मृतिस्थळ हे मराठा इतिहासातील एक महत्त्वाचे स्मारक आहे कारण ते एका पराक्रमी सरदाराच्या जीवनप्रवासाचा शेवटचा भौगोलिक ठाव दाखवते.या स्थळाचा शास्त्रीय इतिहासलेखन, पुरातत्त्वीय नोंदी,आणि स्थानिक मौखिक परंपरा यांच्या आधारे या समाधी स्थळी स्मारक करण्यात यावे अशी मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासना कडे केली असुन या दोघानी आणि त्यांच्या मागणी साठी या उपोषनात नांदेड जिल्हा शाखेचे बबन पाटील,दीपक राजुरकर व कैलास शिंदे यांनी ही सहभाग घेतला आहे.या मागणी च्या पूर्तते साठी नांदेड येथे दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पासुन बेमुदत उपोषण सुरु केले आहे. प्रमुख मागण्या १) नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर सेनापती नेताजी पालकर स्मारक सल्लागार समिती तात्काळ नियुक्ती करावी. जिल्हा नियोजन बैठकीपूर्वी या समितीची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घ्यावी.२) जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली सर सेनापती नेताजी पालकर नियोजन आढावा समिती नियुक्त करून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नियोजन आढावा समितीची बैठक घेणे ३) सरसेनापती नेताजी पालकर स्मारकासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डी पी आर) तयार करावा ४)सरसेनापती नेताजी पालकर स्मारक पुर्व तयारी करण्या साठी प्रकल्प व्यवस्थापन समिती (पी एम सी ) तात्काळ नियुक्त करावी. याप्रमाणे शासनाने तात्काळ दखल घेऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यास एकूण प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर अपेक्षित असलेले निधीचे नियोजन करणे आधीकचे सोपे होणार असून त्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (डी पी आर ) तयार करावा अशी मागणी आहे.अनेक मान्यवरांनी दिल्या भेटीया बेमुदत उपोषणास अभियंता तानाजी हुस्सेकर,हनुमंत पवार, माधवराव पाटील देवसरकर,एनजी कल्याणकर,डॉ.भारती मढवई,डॉ. विद्या पाटील,कल्पना चव्हाण,सुमित्रा वडजकर,अर्चना होगे,सुनिता कल्याणकर,संतोश्री पवार,दीपक पावडे, कैलास शिंदे,दिगंबर हिवराळे, वसंत बालखंड, बबन पाटील, शैलेश शिंदे,दीपक पाटील राजूरकर,इंद्रजीत आवरगंड,कानोबा ध्रुतराज,शेख अहमद शेख लतीफ,राहुल मल्हारी मारुती गवळे,सदा पाटील,विधीज्ञ धोंडीबा पवार,माणिक देशमुख, मारुती भोसले,अभियंता संजय वांगीकर,खुशाल जाधव,तुषार देशमुख,गोविंद पाटील,चंद्रकांत पाटील,श्रीहरी मुंडकर,संजय हंबर्डे, किशोर देशमुख,उद्धव पवार तिरुपती जाधव,शेख सलीम,साहेबराव शिंदे, डॉ.भारत कचरे, डॉ.जी एच आडेराव, विवेक ताटे गजानन खतगावकर, सुहास हुक्के,अजय कदम,गोपीनाथ हुस्सेकर, प्रा डॉ प्रभाकर जाधव, प्रा डॉ व्यंकट पावडे, प्रा डॉ आर जी कुंटुरकर, प्रा एन एन मुंडलोड, प्रा.डॉ कमलाकर कणसे, शे. रा. पाटील, प्रवीण कदम, राजेंद्र ताटे,आसमी विवेक ताटे, केरबा जाधव,भुजंग डिगांबर बंडाले, पंडित बंडाळे, पंडित पवळे, प्रा डॉ राम चव्हाण, सुनील कदम, नवनाथ जोगदंड, दशरथ कपोट,गणेश पाटील चेलेगावकर, डॉ स्वप्नील आढाव, विरेंद्र शेटे यासह अनेक मान्यवरांनी या बेमुदत उपोषणास सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे. राज्य शासनाने व पालकमंत्री नामदार अतुल सावे यांनी तात्काळ दखल घेऊन या स्मारका साठी आवश्यक योग्य ते प्रशासकीय निर्णय आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी तात्काळ पाऊल उचलावे अशी देखील मागणी उपोषण कर्ते मागणी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण आणि मराठा समन्वयक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र शासना कडे केली आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जुलै २०२६


# पुणे येथे हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान आयोजित युपीएससी (UPSC) परीक्षेतील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न




**पुणे (प्रतिनिधी) :** भावी.प्रशासकीय आधिकाऱ्यांनो भविष्यात कोणत्याही दबावाला बळी न पडता सामान्य माणसाला न्याय द्या!हीच खरी लोकसेवा आहे! असे प्रतिपादन महाराष्ट्रातील भूमीपुत्र तथा तेलगंणा राज्याचे पोलीस महासंचालक डॉ.महेश मुरलीधर भागवत (IPS)यांनी केले.ते विद्येचे माहेरघर समझल्या जाणाऱ्या पुणे येथे हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आयोजित ७ व्या महाराष्ट्रातील केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) -२०२५ परीक्षे मधील यश संपादन केलेल्या ११५ गुणवंताच्या गुणगौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की तुम्ही प्रशासकीय "अधिकारी झाल्यानंतर प्रामाणिकपणे, इमानदारीने व प्रभावीपणे काम करा! हा गुणगौरव सोहळा गेल्या ७ वर्षापासुन महाराष्ट्रात हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान (पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड) संचलित महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अ‍ॅड. तात्यासाहेब घुमरे (पवार) यांच्या कल्पकतेतुन हा सुतत्य उपक्रम.अविरतपणे राबवला जातो. या वर्षीच्या या गुणगौरव सोहळ्यात महाराष्ट्रातील ११५ (UPSC) यशवंत भूमीपुत्रांचा गुणगौरव करण्यात आला. या यशवंतांच्या गुणगौरव सोहळ्यासाठी खास तेलंगाणा राज्याचे पोलीस महासंचालक महेश भागवत (IPS) यांची विशेष उपस्थिती होती. हा गुणगौरव सोहळा कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथील भव्य शिरनामे सांस्कृतिक सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे उद्धाटन तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक डॉ. महेश मुरलीधर भागवत (IPS) यांच्या हस्ते झाले. प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते द्विपप्रज्वलन करून महापुरुषाच्यां प्रतिमेचे पूजन करण्यात आले.वंदेमातरम् व महाराष्ट्र गीताचे सामुहिक गायन करण्यात आले.प्रारंभी या गुणगौरव सोहळ्याचे प्रास्ताविक हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान (पारगाव घुमराता.पाटोदा जि.बीड) महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अ‍ॅड. तात्यासाहेब आबासाहेब घुमरे (पवार) (विधीज्ञ उच्च न्यायालय खंडपीठ छ.संभाजीनगर)यांनी केले.आपल्या प्रस्ताविकात त्यांनी हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान हे आनेक सामाजिक लोक उपयुक्त उपक्रम राबवते. गेली ७ वर्षापासून हा गुणगौरव सोहळा आयोजित केला जातो.या मागील उद्देश हा आहे की महाराष्ट्राच्या मातीतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना (UPSC) सारख्या कठीण समजल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे योग्य मार्गदर्शन मिळावे!व याची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील होतकरू विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा!या हेतुनेच हा गुणगौरव सोहळा आयोजित केला जातो. व यातुन ग्राणीण भागातील होतकरु विद्यार्थ्यांना यशस्वी अधिकाऱ्या बरोबर प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळावी आणि कर्तृत्ववान यशवंतांच्या प्रेरणेतून ग्रामीण युवक-युवतींना मोठी स्वप्ने पाहण्याची उमेद मिळावी व ग्रामीण भागातील विद्यार्थी UPSC सारख्या कठीण परिक्षेत उतरावा या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेप्रती उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि नि:पक्षपातीपणा जपत कार्य करण्याचे त्यांनी भावी प्रशासकीय आधिकाऱ्यांना शेवटी भावनिक आवाहन केले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थित असलेले मा.श्री सुनील लिमये (IFS), (CEC) (मेंबर, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली) यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "प्रशासकीय अधिकारी म्हणून यशस्वी होण्याबरोबरच एक संवेदनशील माणूस म्हणून समाजातील गरजूंच्या कामी येणे, हीच खरी प्रशासकीय सेवेची ओळख आहे," असे सांगत प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. तसेच डॉ. दीपक रिपोटे (IRS), (इनकम टॅक्स ट्रिब्युनल, पुणे) डॉ.प्रा. सुभाष भालेकर, (सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य,कृषी महाविद्यालय, पुणे), प्राचार्य डॉ. विश्वनाथ कदम (श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी ता.गेवराई जि.बीड)यांनी ही उपस्थित राहून योग्य मार्गदर्शन केले.यशस्वी गुणवंताचे अभिनंदन!करुन त्यांच्या भविष्यातील उज्ज्ल कार्यासाठी शुभेच्छा! दिल्या.अध्यक्षीय समारोप करताना तेलगंणाचे पोलीस महासंचालक डॉ.महेश मुरलीधर भागवत (IPS)यांनी हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानच्या कार्याचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानने हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून यूपीएससीची तयारी करणाऱ्या आणि यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळेल. विशेषतः अ‍ॅड.तात्यासाहेब घुमरे (पवार)यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला हा उपक्रम अनेक होतकरू युवक-युवतींच्या आयुष्याला नवी दिशा देणारा ठरेल."असा अशावाद व्यक्त केला. यानंतर महाराष्ट्रातील विविध भागांतून UPSC परीक्षा २०२५ मध्ये यश संपादन केलेल्या११५ यशवंतांचा हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड. तात्यासाहेब आबासाहेब घुमरे (पवार)व डॉ.महेश भागवत व मान्यवरांच्या शुभहस्ते ११५ गुणवंताचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा.अशोक कोल्हे,नगरसेवक बालाजी जाधव, कल्याणराव तावरे (उद्योजक पुणे), उद्धव नेटके (कृषी अधिकारी) व पारगांव घुमरा येथिल बहसंख्य नागरिक यांच्यासह हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे अ‍ॅड. योग पाटील, अभियंता धीरज घुमरे(पवार,) कबीर घुमरे, रंजित देशमुख, इंजि.शुभम डरपे, विराज कापसे, शुभम कावळे, नितीन जाधव, रवी (प्रेम) चव्हाण, नितीन बागवाले आणि सचिन भोले, अ‍ॅड. सचिन भगवान जावळे, संभाजी सरवदे, गुरूमित इकबालसिंग गिल, बाबा शिंदे,हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यानी कार्यक्रमाच्या नियोजनापासून अंमलबजावणी पर्यंत अथक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.या सर्व यशस्वी भावी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करतांना अभ्यास कसा करावा हे सांगितले. नियोजनपूर्वक अथक परिश्रम घेऊन अभ्यास केल्यास यश नक्की मिळतेच! असे सांगितले. याची प्रेरणा महाराष्ट्रातील युपीएससी परीक्षेची पूर्व तयारी करणाऱ्या उपस्थित हजारो विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली! मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील ग्रामिण भागातील एका भूमीपुत्रांनी विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे नगरीत हा भव्यदिव्य गुणगौरव सोहळा आयोजित केला.हे काम कौतुकास पात्र आहे. या भव्य व दिमाखदार गुणगौरव सोहळ्याचे बहारद्दार सुत्रसंचलन पाटोदा येथिल जयभवानी महाविद्यालयातील मराठी विषयाचे गाढे अभ्यासक, विद्यार्थीप्रिय प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केलेतर उपस्थित मान्यवर,गणवंत अधिकारी व उपस्थित विद्यार्थ्यांचे व सर्व उपस्थितांचे आभार हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे अभियंता मा.धिरज घुमरे(पवार) व कृषी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे येथिल विद्यार्थीनी कु.विभावरी वाघचौरे यांनी व्यक्त केले.या गुणगौरव सोहळ्याचे सुंदर छायाचित्रण श्री.विलास वीर यानी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अ‍ॅड. तात्यासाहेब घुमरे (पवार ) व सहयोगी अधिष्ठता तथा प्राचार्य डॉ.सुभाष भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हिरकणी सामाजिक प्रतिष्ठनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.कृषी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे च्या वत्तीने सर्व उपस्थितांना अतिशय उत्तम भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.शेवटी राष्ट्रगीताने या गुणगौरव सोहळ्याची सांगता करण्यात आली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.